# पतसंस्थांच्या थकबाकीवर उपाय शोधला.

**www.mahasahakar.com**



महाराष्ट्र राज्यात ३१ मार्च २०११ अखेर ५४१ नागरी सहकारी बँका, १५५७५ नागरी सहकारी पतसंस्था व ७३१७ पगारदार नोकरांच्या सहकारी संस्था होत्या. म्हणजेच एकूण २३४३३ बिगर कृषी पतपुरवठा करणाऱ्या सहकारी संस्थांपैकी ५५७७ संस्था या तोट्यात होत्या. आणि यात प्रामुख्याने नागरी सहकारी बँकांचे प्रमाण तुलनेने मोठे आहे. ३१/०३/२०११ अखेर **५४१ नागरी सहकारी बँकांपैकी ८६ बँका अवसायानात आहेत.** म्हणजेच ५४१ नागरी सहकारी **बँकांपैकी १५.९० टक्के नागरी सहकारी बँका अडचणीत आहेत.** याउलट १५५७५ नागरी सहकारी पतसंस्थांपैकी अडचणीत असणाऱ्या नागरी सहकारी पतसंस्थांची संख्या विविध शासकीय आकडेवारीनुसार ८५० च्या दरम्यान आहे. आणि हे **पतसंस्थांचे प्रमाण ५.४६ टक्के आहे**. परंतु नागरी सहकारी बँका किंवा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना भारतीय रिझर्व्ह बँकेने म्हणजेच ज्या बँकांना बँकींग परवाना दिलेला आहे, म्हणजेच **ज्या बँका बँकींग रेग्युलेशन ॲक्ट अंतर्गत येतात,** त्या सर्वांना १ लाखापेक्षा कमी रकमांच्या ठेवींना परतावा देण्यासाठी **ठेव विमा हमी मंडळाने मान्यता दिलेली आहे**.(डिपॉझीट इन्शुरंन्स ॲड क्रेडीट गॅरंटी कॉर्पोरेशन) परंतु **पतसंस्थांमध्ये ठेवी ठेवणाऱ्या ठेवीदारांच्या रकमांना भारत सरकार किंवा महाराष्ट्र राज्य सरकारने अडचणीच्या काळात ठेवी परतावा देण्यासाठी कुठलीही व्यवस्था केलेली नाही.** नजीकच्या काही वर्षांपूर्वी तत्कालीन महाराष्ट्र राज्य **सहकार आयुक्तांनी पतसंस्थांमधील ठेवींना हमी देण्यासाठी एक सहकारी ठेव हमी मंडळ अस्तित्वात आणले होते**. परंतु त्याला भारत सरकार किंवा महाराष्ट्र राज्य सरकारने कुठलीही **कायदेशीर मान्यता न दिल्यामुळे तथाकथित पतसंस्थांचे ठेव हमी महामंडळ गायब करण्यात आले**. परंतु ज्या पतसंस्थांनी ह्या ठेव हमी महामंडळात करोडो रुपयांची गुंतवणूक केली होती, त्यांच्या व्याजाचा परतावा **१० टक्क्यां ऐवजी ६ टक्के देऊन ४ टक्के बुडविण्यात आले.** आणि त्यामुळे संबंधीत नागरी सहकारी पतसंस्थाचे करोडो रुपयांच्या व्याजाचे नुकसान होऊन त्या नुकसानीच्या रकमा ह्या क्षणापर्यंत अद्यापही कुणाकडूनही वसुल केलेल्या नाहीत. किंबहुना त्याबद्दल संबंधितांवर कुठलीही सहकारी व फौजदारी कारवाई केलेली नाही. **हे प्रकरण महाराष्ट्र व भारताच्या सहकाराच्या अर्थकारणामधील भयंकर कटु सत्य** आहे.

यामुळे पतसंस्थांमधील ठेवीदारांचा या फसव्या व बेकायदेशीर महामंडळामुळे विश्वास उडण्यास मदत झाली. परंतु नागरी सहकारी पतसंस्थांचे जाळे एवढे प्रचंड पसरलेले आहे की, पतसंस्थांमधील ठेवीदारांच्या रकमांचे संर्वधन करण्याची जबाबदारी शेवटी पतसंस्था चालविणाऱ्या संचालकांवरच येते. त्यासाठी वाटलेली कर्जे थकीत होऊ नयेत, व थकीत झालेली कर्जे कशी वसुल होतील, यासाठी प्रभावी यंत्रणा उभी करण्यासाठी सहकार खाते व शासन पूर्णपणे अयशस्वी झालेले आहे.

म्हणून महाराष्ट्र राज्यात पहिले क्रांतीकारक पाऊल व पतसंस्थांमधील थकबाकी वसुलीसाठी जालीम उपाय म्हणून **बृन्हमुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., मुंबई, पत्ता :- ११२, सौरभ बिल्डीग,मोदी इस्टेट, घाटकोपर पोलिस स्टेशन समोर, एल. बी. एस. मार्ग, घाटकोपर (पश्चिम), मुंबई ४०००८६, दुरध्वनी ०२२ - २५१५००९१, फॅक्स ०२२ - २५१५००९४** या फेडरेशनने नागरी सहकारी पतसंस्थांच्या थकीत कर्जदार व त्यांचे जामिनदार यांच्याकडून थकीत रक्कम वसुल करण्यासाठी www.mahasahakar.com वेबसाईट सुरु केली आहे. या वेबसाईटद्वारे **महाराष्ट्र सरकारी कायदा १९६० चे कलम ९१ व १०१ अन्वये पतसंस्थेने आपल्या थकीत कर्जदार व जामिनदारांविरुध्द मिळविलेल्या वसुली दाखल्याचा तपशिल ह्या वेबसाईटमध्ये प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच निगोशिएबल इन्स्टूमेंट ॲक्ट १८८१ चे कलम १३८ अन्वये मिळालेल्या आदेशातील नांवांचा सुध्दा ह्या वेबसाईटवर तपशिल प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे.**

www.mahasahakar.com या वेबसाईटमध्ये तपशिलात थकीत कर्जदार व जामिनदार यांची **संपूर्ण नांवे, कामाचा - व्यवसायाचा पत्ता, गावचा पत्ता, जन्मतारीख - वय, कर्ज घेतलेल्या पतसंस्थेचे नांव - पत्ता, कर्जाची रक्कम, कर्जाची तारीख, महाराष्ट्र सरकारी कायदा १९६० चे कलम ९१ किंवा १०१ वसुली दाखल्याची तारीख तसेच निगोशिएबल इन्स्टूमेंट ॲक्ट १८८१ चे कलम १३८ अन्वये मिळालेल्या आदेशाची तारीख, कर्जासाठी दिलेले तारण इत्यादी आवश्यक माहिती** या वेबसाईटमध्ये समाविष्ट करण्यात आलेली आहे. **त्यामुळे एखाद्या पतसंस्थेमध्ये एखादा कर्जदार किंवा जामिनदार दुसऱ्या कुठल्याही पतसंस्थेत नवीन कर्जदार किंवा जामिनदार होऊ शकणार नाही.** किंबहुना त्याने प्रथम पूर्वीचे त्या पतसंस्थेमधील संपूर्ण थकीत कर्ज व्याजासह भरणा केल्याशिवाय त्यास नवीन कर्ज दुसऱ्या कोणत्याही पतसंस्थेत मंजूर होण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

**यासाठी प्रत्येक पतसंस्थेने खालील तीन गोष्टी प्रथम करणे आवश्यक आहे.**

१) बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था **फेडरेशनचे सभासद होणे** आवश्यक आहे.

२) बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या **वेबसाईटचे सभासद होणे** आवश्यक आहे.

३) महाराष्ट्र सरकारी कायदा १९६० चे **कलम ९१ व १०१** अन्वये तसेच **निगोशिएबल इन्स्ट्रूमेंट ॲक्ट १८८१ चे कलम १३८** अन्वये मिळालेल्या आदेशाची **दोन झेरॉक्स प्रमाणित केलेल्या प्रतींसह मुळ प्रत** फेडरेशनला सादर करणे आवश्यक आहे. (मुळ प्रत तपासून पतसंस्थेस परत करण्यात येईल)

वरील सर्व बाबींची पूर्तता केल्यानंतर संबंधित पतसंस्थेस कुठल्याही नवीन कर्ज अर्जदारास तसेच त्याच्या जामिनदारांस **कर्ज मंजूर करणेपूर्वी www.mahasahakar.com या वेबसाईटवर वापरण्यासाठी दिलेला पासवर्ड वापरुन आलेला अर्जदार व त्याच्या जामिनदारांची इतर पतसंस्थांमध्ये थकबाकी आहे किंवा नाही हे काही क्षणात बघता येईल.** आणि हे थकबाकीदार महाशय व त्यांचे जामिनदार दुसऱ्या पतसंस्थेत थकबाकीदार असतील तर अशा थकबाकीदारांना कर्ज मंजूर करावयाचा प्रश्नच उद्‌भवत नाही. त्यामुळे अनेक पतसंस्थांमधून कर्ज घेऊन थकबाकी करणाऱ्यांचा या पद्धतीने बंदोबस्त होईल. व **त्याचा फायदा मागील झालेली थकबाकी वसुल करण्यास व पुढे थकबाकी न होण्यास मदत होईल.** यासाठी सर्व पतसंस्थांनी फेडरेशनच्या या वेबसाईटचे सभासद होऊन ठेवीदारांच्या सभासदांच्या रकमांच्या सुरक्षतेतेसाठी व आपल्या पतसंस्थांचा कारभार आणखी गतिमान करण्यासाठी त्वरीत सभासद व्हावे, असे या निमित्ताने विनम्र आवाहन करीत आहे.

सरतेशेवटी **जे काम शासनाने करावयाचे आहे ते काम बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., मुंबई ने सुरु केलेले आहे.** थकबाकीचा राक्षस प्रथम त्याच जागेवर थांबविणे आवश्यक आहे. व तद्‌नंतर क्रमाक्रमाने त्याचा समूळ नायनाट करणे हा या बेवसाईटचा मुख्य उद्देश आहे. म्हणून आपण सर्व पतसंस्थांमधील कार्यकर्ते आपले प्रश्न आपणच सोडवू या. जेणेकरुन शासन भविष्यात आपोआप या महत्वाच्या कामात स्वतःहून पुढाकार घेऊन पतसंस्थांच्या ठेवीदारांना बँकांसारखे ठेव हमी महामंडळ अस्तित्वात आणील, यावर आमचा पूर्ण विश्र्वास आहे. **आपण आपले काम प्रथम करु या. सरकार आपोआप आपले काम करेल.**

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार!!!**